MHSN090009282024

**किरकोळ फौजदारी** अर्ज **क्र.११०/२०२४**
सनम चौगुले विरुध्द जुनेद चौगुले

**निशाणी क्र. ५ खालील आदेश**

अर्जदाराने सदरचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, मुळ अर्ज गुणदोषावर चालून त्यामध्ये न्यायनिर्णय पारीत होण्यास कालावधी जाणार आहे. अर्जदारास स्वतःचे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे व तीला वैवाहिक व शारीरिक सुखापासून वंचित ठेवले आहे. अर्जदार ही मानसिकदृष्टया खचलेली आहे. जाबदार क्र. १ यांचे शिक्षण बी.ई. मेकॅनिकल झालेले असुन ते पूणे येथे स्टॅन्टीक रिसोर्स नेट या मल्टीनॅशनल कंपनीमध्ये मेकॅनिकल इंजिनियर या पदावर नोकरी करीत आहे. त्यास वार्षिक ७,८७,५००/- इतके पॅकेज आहे. दरमहा जाबदार क्र. १ यास रक्कम रुपये ६५,०००/- इतके वेतन मिळते. जाबदार क्र. २ व ३ हे दोघेही जिल्हा परिषद शाळेमध्ये मुख्याध्यापक व शिक्षक असुन त्यांनाही दरमहा प्रत्येकी १,००,०००/-

रुपये वेतन मिळते. जाबदार क्र. १ च्या नावे बागणी येथील ६८.४३ गुंठे शेतजमीन आहे. त्यापासून जाबदार यास दरवर्षी पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. जाबदार क्र. १ हा अर्जदाराला पोटगी देण्यास समर्थ आहे. त्याचेवर अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. अर्जदाराकडे स्वतःचे पालन पोषणासाठी कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती तिच्या आई वडीलांच्या कृपाछत्राखाली जगत आहे. जाबदार यांनी केलेल्या मानसिक, शारीरिक व भावनिक छळामुळे अर्जदार ही स्वतःचा उदर निर्वाह करण्यास असमर्थ झाली आहे. यास्तव मुळ अर्जाचा अंतीम निकाल लागेपावेतो जाबदारांनी अर्जदारावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार करु नये असा संरक्षणात्मक आदेश अर्जदाराच्या लाभात दयावेत, अर्जदारास घरभाडे दरमहा रक्कम रुपये १०,०००/– अर्जदाराला मिळावे, अर्जदाराच्या सोन्याच्या २ अंगठया अर्जदाराला मिळाव्यात, दरमहा २५,०००/– अर्जदाराला देण्याचा आदेश व्हावा व नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये ५०,०००/– अर्जदाराला देण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर जाबदार यांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील संपूर्ण कथने नाकारली आहे. जाबदार पूढे असे कथन करतात की, जाबदार क्र. १ व अर्जदार हे एकमेकांच्या नात्यातील आहेत. अर्जदार ही जाबदार क्र. १ यांच्या चुलत आत्याची मुलगी आहे. त्यांचा विवाहापुर्वी एकमेकांशी परीचय होता. त्यांच्यामध्ये

प्रेमसंबंध होते. त्यांचा विवाह त्यांच्या मर्जीनुसार झालेला आहे. विवाहाचा खर्च जाबदार क्र. १ याच्या आई वडीलांनी केलेला आहे. अर्जदार हिने वेळोवेळी अर्जात नमुद केल्याप्रमाणे वेगवेगळी कारणे सांगुन जाबदार क्र. १ यास संसार सुखापासून वंचित ठेवले आहे. तसेच अर्जदार व जाबदार क्र. १ हे पूणे येथे रहात असताना जेवण बाहेरुन बोलावणे, रात्री उशीरापर्यंत आंघोळ करणे, सकाळी ९ ते १० च्या दरम्यान उठणे व दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्वतःची कामे करीत राहणे असे कृत्य करुन जाबदार क्र. १ यास मानसिक त्रास देवुन त्यास शारीरिक व वैवाहिक जिवनापासून वंचित ठेवले. जाबदार क्र. २ व ३ हे प्राथमिक शाळेवर शिक्षक म्हणून नोकरीस असल्याने त्यांचा अर्जदारासोबत सुन या नात्याने जास्त काळ संपर्क राहिला नाही. जाबदार क्र. ४ हे अर्जदारांपासून दूरवर रहात होती. ती कधीही पूणे येथे त्यांच्याकडे राहण्यास गेली नाही. जाबदार क्र. १ हा कधीही कामोत्तेजक गोळयांचे सेवन करत नव्हता व नाही. अर्जदाराने अर्जात नमुद केलेली कथने काल्पनीक आहेत. जाबदार क्र. १ मध्ये कोणतीही शारीरिक कमतरता नाही. अर्जदाराने वेगवेगळी कारणे सांगून जाबदार क्र. १ यास जाणीवपुर्वक संसार सुखापासून वंचित ठेवले आहे.

४. जाबदारांचे पूढे असे कथन आहे की, जाबदार क्र. १ ते ३ यांनी

अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे मानसिक, शारीरिक व भावनिक छळ अगर अत्याचार केलेला नाही. उलट जाबदार क्र. १ ने अर्जदाराची वेळोवेळी हौस–मौज, कपडा–लत्ता घेण्याकरीता वेळोवेळी खर्चाचे पैसे दिलेले आहेत. जाबदार क्र. १ हा कामावर असताना, त्याच्या परवानगीशिवाय अर्जदार ही दिनांक ०९.०८.२०२४ रोजी कोणतेही संयुक्तिक कारण नसताना माहेरी निघुन गेली आहे. जाबदार क्र. १ हा अर्जदाराला नांदवण्यास तयार आहे. जाबदार क्र. १ यास नोकरीतून ६६,७२२/– रुपये पगार मिळतो. त्यातून शेतीसाठी काढलेल्या कर्जाचा हप्ता २२,५६६/– रुपये, घरभाडे ७,०००/– रुपये, जेवण खर्च ५,०००/–रुपये व पेट्रोल खर्च ७,०००/– रुपये इतकी रक्कम वजा जाता जाबदाराकडे २५,१५६/– रुपये पगार शिल्लक राहतो. जाबदारास शेतीतून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. यास्तव त्यांनी पोटगीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदाराचा अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले व दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला. त्यातून खालीलप्रमाणे मुददे निकषाकरिता समोर आले. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय |

| | | |
|---|---|---|
| २ | अंतिम आदेश ? | अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे. |

**कारणमिमांसा.**

**मुददा क्र. १ व २ करिताः**

६. अर्जदार व जाबदार तर्फे वकीलांनी युक्तिवादादरम्यान आपापल्या कथनाचा पुनरुच्चार केला. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे नातेसंबंधाबददल प्रस्तुत प्रकरणामध्ये वादातीत नाहीत. जाबदार याने अर्जदार ही त्याची पत्नी आहे व ती सध्या माहेरी रहात आहे. जाबदार हा नोकरी करीत असुन त्यास नोकरीतून दरमहा ६६,७२२/– रुपये पगार मिळतो या बाबी मान्य केल्या आहेत. महिलांचे कौटुंबिक छळांपासून संरक्षण कायदयाचे कलम २३ प्रमाणेचा अर्ज निकाली काढत असतांना तिच्या सोबत कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे कथन प्रथमदर्शनी अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये तीला झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराची इंत्यभूत माहिती दिली आहे.

७. अर्जदाराने प्रस्तुत अर्जाद्वारे, मुळ अर्जाचा अंतीम निकाल लागेपावेतो जाबदारांनी अर्जदारावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार करु नये असा संरक्षणात्मक आदेश अर्जदाराच्या लाभात दयावेत, अर्जदारास घरभाडे दरमहा रक्कम रुपये १०,०००/– अर्जदाराला मिळावे, अर्जदाराच्या सोन्याच्या २ अंगठया

अर्जदाराला मिळाव्यात, दरमहा २५,०००/– अर्जदाराला देण्याचा आदेश व्हावा व नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये ५०,०००/– अर्जदाराला देण्यात यावेत अशी विनंती केली आहे. परंतू, सदर बाबी या पुराव्याअंती अभिलेखावर येणार आहेत. अंतरिम पोटगी व्यतीरिक्त इतर मागण्यांकरीता योग्य तो पुरावा अभिलेखावर येवुन गुणदोषावर न्यायनिर्णय पारीत करणे उचीत होणार आहे. यास्तव प्रस्तुत अर्जामध्ये केवळ अंतरिम पोटगीचा विचार करण्यात येत आहे.

८. अर्जदाराच्या कथनांप्रमाणे जाबदार यांनी तिला संसार सुखापासून वंचित ठेवुन कौटूंबिक हिंसाचार करुन तिचा मानसिक, शारीरिक व भावनिक छळ केला किंवा कसे, तसेच ती माहेरी रहात असल्यापासून तिच्या उदर निर्वाहाची व दैनंदिन खर्चाची कोणतीही काळजी घेतली किंवा कसे, तसेच तिला कोणतेही उत्पन्नांचे साधन नाही अगर ती स्वःइच्छेने माहेरी राहत आहे किंवा जाबदार यांनी तिला घराबाहेर हाकलून दिले किंवा कसे हे पुराव्याअंती ठरणार आहे. प्रस्तुत अर्जाचा निकाल लागेपर्यंत बराचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. दरमयानच्या काळामध्ये अर्जदार यांना उदारनिर्वाह व प्रकरण चालविण्यासाठी लागणा–या खर्चाचा विचार करणे आवश्यक आहे.

९. कौटुंबिक हिसांचाराच्या प्रथमदर्शनी आरोपासांबत अंतरिम पोटगीचा

अर्ज निकाली काढत असतांना दोन्ही पक्षकांराचा आर्थिक दर्जा सुध्दा पाहणे आवश्यक आहे. त्याकरिता अर्जदार व जाबदार यांनी आपली मिळकत व जबाबदारी दाखविण्यासाठी तसेच **मा. सर्वोच्च न्यायालयाने रजनेश वि. नेहा व इतर ( क्रि. अपील क्र. ७३०/२०२०)** मध्ये दिलेल्या निर्देशाचे अनुपालन करण्याकरिता त्यांची मिळकत व जबाबदारीबाबतचे शपथपत्र अनुक्रमे निशाणी क्र. १८ व २१ अन्वये अभिलेखावर दाखल केले आहे.

१०. जाबदार याने तो नोकरीस असुन त्याला दरमहा रक्कम रुपये ६६,७२२/- पगार मिळतो ही बाब मान्य केली आहे. परंतू, त्यातून दरमहा खर्च वजा जाता केवळ रक्कम रुपये २५,१५६/- रुपये इतका पगार जाबदाराकडे उरतो असे जाबदाराने कथन केले आहे. अर्जदाराने जाबदारांच्या नावे असलेल्या शेतमिळकतीचे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केले आहेत. अर्जदाराने निशाणी क्र. १७ अन्वये तिचे उत्तरदायीत्वाचे व जबाबदारीचे शपथपत्र दाखल केले असुन त्यामध्ये जाबदारास नोकरीतून मिळणारा पगार व शेतजमीन यातून दरवर्षी ६०,००,०००/- रुपये उत्पन्न मिळते असे नमुद केले आहे. तसेच अर्जदाराचे शिक्षण अर्जदाराने एम.ए.बी.एड असे नमुद केले आहे व सर्वसाधारण मासिक खर्च ३५,०००/- असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की,

तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. परंतू, अर्जदाराचे शिक्षण पाहिले असता ती नोकरी करुन स्वतःचा उदरनिर्वाह करु शकते असे दिसते. परंतू अर्जदार सध्या नोकरी करते किंवा नाही याबाबतचा तपशिल अभिलेखावर नाही तसेच जाबदार यांनी देखील अर्जदाराच्या नोकरीबाबत व तिच्या उत्पन्नाबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. यावरुन यामितीस अर्जदारास नोकरीपासून उत्पन्न मिळते असा निष्कर्ष निघत नाही.

११. अर्जदारातर्फे वकीलांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये लेखी युक्तिवाद दाखल करुन त्यासोबत खालीलप्रमाणे न्यायनिर्णय अभिलेखावर दाखल केले आहेत.

१. Kaushal Arvind Thakker Vs. Jyoti Kaushal Thakker and Anr. AIR Online 2024 BOM 398. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये मे. मुंबई उच्च न्यायालयाने असा निष्कर्ष नोंदविला आहे की, "पत्नी नोकरी करते किंवा तिला काही उत्पन्न आहे याचा अर्थ ती पोटगी मिळण्यास पात्र नाही असा होत नाही." प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार ही नोकरी करते याबाबतचा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा जाबदार यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

२. Shachindra Kamala Prasad Shukla Vs. Priya Shachindra Shukla, 2025 (5) ABR 336. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये

मा. मुंबई उच्च न्यायालयाने पोटगीची रक्कम निश्चित करण्याकरीता काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. ते पूढीलप्रमाणे,

१. पक्षकाराची सामाजिक आणि आर्थिक स्थिती

२. पत्नी आणि अवलंबून असलेल्या मुलांचा वाजवी दर्जा

३. पक्षकांराची वैयक्तिक पात्रता आणि रोजगार स्थिती

४. अर्जदारांचे स्वतंत्र उत्पन्न किंवा मालमत्ता

५. वैवाहिक घरात पत्नीने उपभोगलेल्या जिवनमानाचा दर्जा

६. जबाबदा–यांसाठी नोकरीत केलेला त्याग

७. काम न करणा–या पत्नीसाठी वाजवी खटल्यांचा खर्च

८. पतीची आर्थिक क्षमता, त्याचे उत्पन्न व देखभालीचे दायित्व हे घटक पोटगी देण्याकरीता निश्चित केलेले आहेत.

१२. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये वर्णन केल्याप्रमाणे अर्जदार व जाबदार यांची सामाजिक व आर्थिक स्थिती व त्याबाबत अभिलेखावर आलेले प्रथमदर्शनी पुरावे यांचे अवलोकन केले. अर्जदार ही नोकरी करते किंवा तिला स्वतःचे उत्पन्नाचे साधन आहे हे दाखविण्याकरीता कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदारास तिचा उदरनिर्वाह चालवणे, दैनंदिन खर्च तसेच सदर केसच्या कामकाजासाठी न्यायालयात जाणे येण्याकरीता खर्चाकरिता पैशांची

आवश्यकता आहे. त्याप्रमाणे अर्जदारांचे राहणीमान, दैनंदिन गरजा व सध्याची महागाई या सर्व गोष्टींचा विचार करता प्रस्तुत अंतरीम पोटगीची मागणी मंजूर होणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने जाबदार यास नोकरीतून मिळणारे उत्पन्न तसेच शेतीतून मिळणारे संभाव्य उत्पन्न, तसेच जाबदार क्र. १ याचे उत्पन्न व उत्तर दायित्व यांचा विचार करता, जाबदार क्र. १ हे अर्जदारास दरमहा रक्कम रुपये १५,०००/- अंतरीम पोटगी देऊ शकतात असे अनुमान निघते. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर अशंतः होकारार्थी देवुन मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा (निशाणी क्र. ५) चा अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदार यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदारास अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये १५,०००/- अंतरीम पोटगी दयावी.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.11 17:31:47 +0530

तासगांव — ( एस.वाय. वाकचौरे )

दिनांकः १०.०३.२०२६ — प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Abhay Arvind Randive. |
| Court | : | Shri. S.Y. Wakchaure,<br>J.M.F.C. Tasgaon |
| Date of order | : | 10/03/2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 10/03/2026 |
| Order uploaded on | : | 10/03/2026 |